# HI-KLASS TRADING AND INVESTMENT LIMITED

**Regd Off: 02, Shanti Kutir Building, Shivaji Road, Off M G Road, Kandivali West, Mumbai - 400067**
**CIN: L51900MH1992PLC066262, Website: www.hiklass.co.in**
**Contact: 8100121394, Email ID: info@hiklass.co.in**

May 30, 2026

To,
The Secretary, Listing Department
**BSE Limited**
P. J. Towers, 1st Floor
Dalal Street
Mumbai – 400 001
Maharashtra, India

**Ref: Scrip Code in BSE** - 542332

**Sub:** Submission of Newspaper Publication for Audited Financial Results for the fourth Quarter and financial year Ended March 31, 2026.

Dear Sir/Madam,

Pursuant to **Regulation 47** of the **SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**, please find enclosed herewith copies of the newspaper advertisements published for the **Audited Financial Results for the fourth Quarter and financial year Ended March 31, 2026**, which were approved by the Board of Directors at its meeting held on 29-05-2026.
The said financial results were published in the following newspapers on 30-05-2026.

1. **Financial Express** – English (National Daily)
2. **Pratahkal** – Marthi (Regional Daily- Mumbai)

You are requested to kindly take the same on record.

Thanking You,

Yours Faithfully,

***For HI-KLASS TRADING AND INVESTMENT LIMITED***

Sanjay Kumar Jain
Digitally signed by Sanjay Kumar Jain
Date: 2026.05.30 14:03:53 +05'30'

Sanjay Kumar Jain
Managing Director
Din: 00415316

प्रातःकाल
www.pratahkal.com

# संपादकीय

## इंधन दरवाढीचा भडका

पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे महागाईचे संकट अधिक तीव्र होत असताना, सरकारची अर्थनीती, परराष्ट्र दबाव आणि तेल कंपन्यांच्या नफ्याचे गणित यावर आता गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. इंधनाच्या ज्वालांनी केवळ वाहनधारकांचेच नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचेच कंबरडे मोडण्याची भीती निर्माण झाली आहे. या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी केंद्र सरकारला चहूबाजूंनी घेरण्यास सुरवात केली असताना, मुंबईतील एका आर्थिक कार्यक्रमात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या दरवाढीचे खापर थेट सरकारी तेल कंपन्यांच्या माथी फोडून स्वतःचे हात झटकण्याचा प्रयत्न केला. केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर दहा रुपयांची कपात करून आधीच देशाच्या तिजोरीला पावणेदोन लाख कोटी रुपयांच्या महसुलाचा फटका सोसला असून, तसे केले नसते तर इंधन आणखी दहा रुपयांनी महागले असते, असा दावा अर्थमंत्र्यांनी केला. वरकरणी हा दावा योग्य वाटत असला तरी तो पूर्णपणे अर्धसत्यावर आधारित असून, त्यामागील मूळ गणिते लपवणारा आहे.

वास्तविक पाहता, केंद्र सरकारने उत्पादन शुल्कात केलेली ही कपात सामान्य जनतेला महागाईपासून दिलासा देण्यासाठी नव्हती, तर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल महागल्यामुळे भारतीय तेल कंपन्यांना सोसावा लागणारा दैनंदिन ६०० कोटी रुपयांचा अवाढव्य तोटा रोखण्यासाठी केलेली ती एक अंतर्गत प्रशासकीय मलमपट्टी होती. अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध सुरू होऊन दीड महिना उलटल्यानंतर केंद्र सरकारला ही कर कपातीची उपरती झाली, कारण तोपर्यंत पाच राज्यांतील मतदारांना आकर्षित करण्यासाठी इंधनाचे भाव कृत्रिमरीत्या रोखून धरण्यात आले होते. त्यामुळे आता निवडणुका संपताच महसूल बुडाल्याचे रडगाणे गाऊन जनतेसाठी मोठे बलिदान दिल्याचा आव आणणे अर्थमंत्र्यांना शोभत नाही. गेल्या बारा वर्षांतील म्हणजेच २०१४ ते २०२६ या काळातील सरकारी तेल कंपन्यांच्या नफ्याची आकडेवारी तपासली, तर नफ्याचे पारडं कितीतरी पटीने जड असल्याचे उघड होते. या प्रदीर्घ काळात जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती सरासरी प्रति बॅरल ८० डॉलरच्या खालीच होत्या, ज्याचा फायदा घेऊन या कंपन्यांनी साडेतीन ते चार लाख कोटी रुपयांचा घसघशीत नफा कमावला आहे.

या बारा वर्षांतील जागतिक घडामोडी आणि तेलाच्या किमतींचे चढ-उतार पाहिले तर २०१४ मधील ९९ डॉलर प्रति बॅरल असलेला भाव २०१५ मध्ये पुरवठा वाढल्याने ५३ डॉलरवर आला आणि २०१६ मधील मंदीत तो ४५ डॉलरपर्यंत घसरला. २०१७ मध्ये ओपेक देशांच्या उत्पादन कपातीमुळे तो ५४ डॉलर झाला, तर २०१८ मध्ये अमेरिकेने इराणवर निर्बंध लादल्याने तो ७१ डॉलरवर पोहोचला. २०१९ च्या अमेरिका-चीन व्यापार युद्धात भाव ४३ डॉलर झाले आणि २०२० च्या जागतिक लॉकडाऊनमध्ये इतिहासात पहिल्यांदाच मागणी पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे ते १४ ते १८ डॉलरच्या अभूतपूर्व नीचांकावर आले होते. २०२१ मध्ये बाजारपेठा पुन्हा सुरू होताच भाव ७० डॉलरवर गेले आणि २०२२ च्या रशिया-युक्रेन युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊन ते कच्च्या तेलाने १२५ डॉलरचा टप्पा ओलांडला. याच कठीण काळात भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करण्याचे धाडसी धोरण स्वीकारले, ज्यामुळे २०२३ आणि २०२४ मधील गाझा संघर्षानंतरही जागतिक बाजारात तेलाचे दर ८२ डॉलरवर स्थिर राखण्यात भारताला यश आले. २०२५ मध्ये चीनमधील घटती मागणी आणि अमेरिकेतील विक्रमी उत्पादनामुळे भाव ६९ डॉलरवर आले होते. अलीकडेच फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झालेल्या अमेरिका-इस्त्रायल-इराण संघर्षामुळे कच्चे तेल पुन्हा १२० डॉलरच्या पार गेले होते, परंतु मे २०२६ पर्यंत तणाव निवळल्याने ते ९० डॉलरच्या आसपास स्थिरावले आहे.

सरकारी तेल कंपन्यांनी या काळात २०१४-१५ मध्ये सुमारे १० हजार कोटी, २०१५-१६ मध्ये २४ हजार कोटी, २०१६-१७ मध्ये ३४ हजार कोटी, २०१७-१८ मध्ये ३५ हजार कोटी, २०१८-१९ मध्ये २८ हजार कोटी, २०२०-२१ मध्ये ५१ हजार कोटी, २०२३-२४ मध्ये ८६ हजार कोटी आणि २०२४-२५ मध्ये ५५ हजार कोटी रुपयांचा प्रचंड नफा मिळवला आहे. युक्रेन युद्धानंतर रशियाकडून भारताला प्रति बॅरल ५ ते ३० डॉलरपर्यंतची जी मोठी सूट मिळत होती, त्या स्वस्त तेलावर प्रक्रिया करून भारतीय कंपन्यांनी दरवर्षी तब्बल ५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याच्या पेट्रोलियम उत्पादनांची आंतरराष्ट्रीय बाजारात, विशेषतः युरोपमध्ये यशस्वी निर्यात केली. या निर्यातीतून मिळालेल्या ३५ ते ५० हजार कोटी रुपयांच्या निव्वळ अतिरिक्त नफ्यातील तब्बल ८० टक्क्यांहून अधिक हिस्सा रिलायन्स आणि नायरा एनर्जी यांसारख्या खाजगी कंपन्यांच्या झोळीत गेला. दुसरीकडे, सरकारी तेल कंपन्यांनी रशियाकडून मिळालेल्या याच स्वस्त तेलाची देशांतर्गत बाजारात विक्री करून १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त 'विंडफॉल' नफा कमावला. रशियन तेलाच्या या सवलतीमुळे सरकारी कंपन्यांना देशांतर्गत बाजारात पेट्रोलवर प्रति लिटर १५ रुपये आणि डिझेलवर प्रति लिटर १२ रुपयांपर्यंतचा निव्वळ नफा मिळत होता. इतका प्रचंड नफा कमावून तिजोऱ्या भरल्यानंतर आता केवळ महसूल बुडत असल्याचा कांगावा करून अर्थमंत्र्यांनी जनतेला सुनावणे अत्यंत अनाठायी आहे.

सध्याची सर्वात चिंताजनक आणि गंभीर बाब अशी की, अमेरिकेच्या भू-राजकीय दबावापुढे झुकून भारताने रशियाकडून सवलतीच्या दरातील तेल खरेदी आता पूर्णपणे बंद केली आहे. या धोरणात्मक निर्णयामुळे देशाचे किती मोठे आर्थिक नुकसान होत आहे, याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. परवाच भारत दौऱ्यावर आलेल्या अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष लवकरच भारताचा दौरा करणार असल्याची एकतर्फी घोषणा केली. हा दौरा व्हेनेझुएला-भारत तेल खरेदी करारासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, रशियाला पर्याय म्हणून भारताने अमेरिका आणि व्हेनेझुएला कडून जास्तीत जास्त कच्चे तेल खरेदी करावे यासाठी वॉशिंग्टनकडून नवी दिल्लीवर उघड दबाव टाकला जात आहे.

या सोबतीला, भारत अमेरिकेकडून पुढच्या पाच वर्षांत तब्बल ५०० अब्ज डॉलर म्हणजेच भारतीय चलनात सुमारे ४१ लाख ५० हजार कोटी रुपये मूल्याच्या वस्तूंची खरेदी करणार असल्याची घोषणाही अमेरिकन परराष्ट्रमंत्र्यांनी एकतर्फी करून टाकली. विशेष म्हणजे, भारताचा एकही जबाबदार मंत्री किंवा अधिकारी रुबियो यांचे हे दावे खोडून काढण्याची हिंमत दाखवत नाही, ही सरकारची मूक संमती आहे की अमेरिकेच्या आर्थिक साम्राज्यवादापुढे घेतलेले लोटांगण आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे. सध्या रुपया केवळ डॉलरसमोरच नाही, तर आशियातील इतर उदयोन्मुख देशांच्या आणि शेजारील देशांच्या चलनांच्या तुलनेतही कमालीचा ढासळत चालला आहे. ही दरवाढ इथेच थांबणारी नाही. बाजार विश्लेषकांच्या अंदाजानुसार आगामी काळात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती प्रति लिटर १२० ते १३० रुपयांचा टप्पा सहज ओलांडू शकतात. जर इंधनाचा हा भडका असाच सुरू राहिला, तर देशांतर्गत वाहतूक खर्च वाढून भाजीपाला, अन्नधान्य आणि सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कडाडतील आणि महागाईचा हा अक्राळविक्राळ भस्मासूर सर्वसामान्यांचे संपूर्ण जगणेच उद्ध्वस्त करून टाकेल, हे निश्चित आहे.

# 'गोकुळ'ला हलाल सर्टिफिकेशन भोवणार का?

❐ जगन घाणेकर, मुंबई

'कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर' अर्थात 'गोकुळ' दुग्ध उत्पादन कंपनीने तूप, लोणी आणि दूध पावडर यांसाठी हलाल प्रमाणपत्र घेतल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले.

वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचे पुत्र नविद मुश्रीफ हे या कंपनीचे अध्यक्ष आहेत. गोकुळचे तूप आणि दूध पावडर आखाती देशांमध्ये निर्यात केले जातात आणि आंतरराष्ट्रीय निर्यातीसाठी अशा प्रमाणपत्रांची आवश्यकता असल्याचा खुलासा खुद्द हसन मुश्रीफ यांनी केला आहे.

गोकुळने २०२२ सालीच हलाल प्रमाणपत्र घेतल्याचेही मुश्रीफ यांनी स्पष्ट केले आहे. घट्ट आणि अधिक साय निर्माण करणारे दूध म्हणून ख्याती असणारे गोकुळ दूध राज्यातील अनेक ग्राहकांचे पसंतीचे दूध आहे त्यामुळे इतर कंपनीच्या दुधापेक्षा महाग असले तरी अनेक जण ते प्रतिदिन आवडीने खरेदी करतात. गोकुळ दुधाने आजतागायत आपला दर्जा टिकवून ठेवल्याने अनेक वर्षांपासून केवळ गोकुळ दूध खरेदी करणारी हजारो कुटुंब आज राज्यात आहेत. राज्यात आणि राज्याबाहेरही गोकुळचे दूध आणि दुग्धजन्य उत्पादने मोठ्या प्रमाणात विकली जातात.

गोकुळचे ग्राहक हे बहुसंख्य हिंदूच आहेत त्यामुळे गोकुळने हलाल प्रमाणपत्र घेतल्याचे लक्षात आल्यावर अनेकांना धक्का बसला आहे. याचा परिणाम म्हणून येणाऱ्या काळात गोकुळची ग्राहकसंख्या रोडवण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंतरराष्ट्रीय निर्यातीसाठी हलाल प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे हसन मुश्रीफ यांनी सांगितले असले, तरी गोकुळपेक्षा कितीतरी पटीने वार्षिक उलाढाल असलेल्या अनेक भारतीय कंपन्या हलाल प्रमाणपत्र न घेता आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम व्यवसाय करत आहेत, त्यामुळे मुश्रीफ यांचे म्हणणे मनाला न पटणारे आहे. व्यवसायवृद्धीसाठी हलाल प्रमाणपत्र घेण्यात मुश्रीफांना काही गैर वाटत नसले तरी हलाल प्रमाणपत्र घेणे म्हणजे आतंकवादाला प्रोत्साहन देणेहे समीकरण आता सर्वश्रुत झाले आहे.




जागतिक पातळीवर अनधिकृतपणे समांतर अर्थव्यवस्था उभारणाऱ्या हलाल प्रमाणपत्राने भारततही आपले हातपाय घट्ट रोवले आहेत. या प्रमाणपत्राचे धोके ओळखून उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकारने हलाल प्रमाणपत्रावर बंदी घातली आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्रातही हलाल प्रमाण पत्राच्या नोंदीवर आणि हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी आणावी यासाठी हिंदुत्ववादी आणि राष्ट्रप्रेमी संघटना मागील काही काळापासून सरकारचा पाठपुरावा करत आहेत, सरकार दरबारी निवेदने देत आहेत, सनदशीर मार्गाने आंदोलने करत आहेत. जागतिक पातळीवर काही मुस्लिम संघटना अनधिकृतपणे हलाल सर्टिफिकेशनची योजना राबवत आहेत.

त्यांच्या शाखा आज भारतभर निर्माण झाल्या आहेत. या संघटना व्यापारी कंपन्यांकडून लक्षावधी रुपये घेऊन त्यांना हलाल प्रमाणपत्र देतात. या प्रमाणपत्रासोबत उत्पादनावर छापण्यासाठी लोगो देण्यात येतो. मुस्लिमबहुल भागात तेथील नागरिक हा लोगो पाहूनच उत्पादने खरेदी करतात, असे यांच्याकडून सांगण्यात येते.

एकदा हलाल प्रमाणपत्र घेतल्यावर दरवर्षी ने नूतनीकरण करण्यासाठी पुन्हा हजारो रुपये या संघटना व्यापाऱ्यांकडून वसूल करतात.

या सर्व प्रक्रियेत त्या देशातील सरकारला कोणताही लाभ होत नाही. सरकार दरबारी या सर्व व्यापाराची कोणतीही अधिकृत नोंद नसते. या योजनेतून गोळा करण्यात आलेल्या पैशातून आज हलाल इकॉनॉमी जागतिक पातळीवरील एक बलाढ्य इकॉनॉमी झाली आहे. या योजनेतून मिळणारा पैसा जगभरात पकडल्या गेलेल्या आतंकवाद्यांना न्यायालयीन साहाय्य पुरवण्यासाठी वापरला जातो हे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे. यासंदर्भातील अनेक व्हिडीओज आणि लेख गूगलवर उपलब्ध आहेत.

भविष्यातील धोका ओळखून उत्तर प्रदेश सरकारने राज्यात विखुरलेल्या या संघटनांची पाळेमुळे खणून काढायला सुरुवात केली आणि राज्यात हलाल सर्टिफिकेशन करण्यावर बंदी घातली आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या हलाल इकोनॉमीच्या अनधिकृत सर्टिफिकेशनवर आता अनेक राष्ट्र बंदी घालण्याच्या तयारीत असून काही राष्ट्रांनी याबाबत कडक धोरण आखले आहे. खाद्यपदार्थांच्या संदर्भात कायद्यानुसार 'भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण' (एफएसएसएआय) या शासकीय संस्थेला खाद्यपदार्थांचे मानके ठरवण्याचा व प्रमाणपत्र देण्याचा अधिकार देण्यात आला आहे; मात्र 'हलाल प्रमाणन' ही एक समांतर प्रणाली उभी करण्यात आली आहे, जी खाद्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत भ्रम निर्माण करून सरकारी नियमांचे उल्लंघन करते. महाराष्ट्रासह देशभरात 'हलाल इंडिया', 'हलाल सर्टिफिकेशन सर्व्हिसेस इंडिया', 'जमियत उलेमा-ए-हिंद', 'जमियत उलेमा-ए-महाराष्ट्र' आदी अनेक संस्थांकडून बेकायदेशीरपणे हलाल प्रमाणपत्रांचे वाटप करून अब्जावधी रुपये गोळा करण्यात येत आहेत.

स्वतः केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनीही खाजगी संस्थांना अवैधरित्या प्रमाणपत्र वाटप करून पैसे गोळा करण्याचा अधिकार नाही, असे यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

हलाल इकोनॉमीला सहकार्य म्हणजे आतंकवादाला समर्थन हे समीकरण लक्षात घेऊन हलाल प्रमाणपत्र घेणाऱ्या कंपन्यांवर, उपहारगृहांवर आणि वस्तूंवर नागरिकांनी बहिष्कार घालावा, वस्तू विकत घेताना त्यावर हलाल चिन्ह आहे का पडताळावे, हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये जाताना बोर्डावर, मेन्यूकार्डावर हलालचे चिन्ह आहे का तपासावे.

असे चिन्ह असलेले पदार्थ खरेदी करणे टाळावे अशा प्रकारचे आवाहन देशप्रेमी संघटना आणि संस्था सर्वत्र करत असताना आता घराघरात पोहोचलेल्या गोकुळ कंपनीनेच हलाल प्रमाणपत्र घेतल्याचे वृत्त वाचनात आल्याने गोकुळाविषयी जनमानसांत रोष निर्माण झाला आहे. हा रोष गोकुळच्या एकूणच व्यवसायावर परिणाम करतो की गोकुळला हलाल सर्टिफिकेशन रद्द करायला लावतो हे येणाऱ्या काळात पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# ममतांसमोरील कठीण आव्हान!

❐ अभय गोखले

कॅट क्लाइंब्ड द ट्री ओन्ली अंडर ड्युरेस " मांजर स्वतःच्या इच्छेने झाडावर चढली नाही,तर तिला कुणीतरी घाबरवल्यामुळे किंवा तीच्या जीवाला धोका निर्माण झाल्यामुळे जीव वाचवण्यासाठी ती नाइलाजाने झाडावर चढली. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची अवस्था सध्या त्या मांजरी सारखी झाली आहे. इतके दिवस विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीला कस्पटासमान लेखणाऱ्या ममतांना, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाचा दारुण पराभव झाल्यानंतर आता अचानक इंडिया आघाडीची आठवण झाली आहे. पश्चिम बंगालच्या जनतेने, ममतांना सत्तेवरून खाली उतरवल्यानंतर आता भाजपा बरोबर आपण एकट्याने लढू शकणार नाही,याची जाणीव झालेल्या, ममतांना आता इंडिया आघाडीची उचकी लागली आहे. काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी आघाडी या इंडिया आघाडीतील घटक पक्षांबरोबर पश्चिम बंगालमधील विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत समझोता करण्यास,ममतांनी आजवर नकार दिला होता. काँग्रेसला तर त्यांनी अपमानास्पद जागा सोडण्याची तयारी दाखवून एक प्रकारे काँग्रेसच्या जखमेवर मीठ चोळले होते.मात्र नुकत्याच पार पडलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने,त्यांच्या पक्षाची धुळधाण उडवल्यानंतर, ममतांना आता काँग्रेस आणि डावे पक्ष एकदम जवळचे वाटू लागले आहेत.



ममतांनी भाजपाच्या विरोधातील पक्षांना, नुकतेच असे आवाहन केले आहे की,भाजप हा आपल्या सर्वांचा कॉमन शत्रू असल्याने,आपण आपापसातील हेवेदावे विसरून, भाजपा विरोधात एकत्र आले पाहिजे.शत्रूचा शत्रू तो आपला मित्र असे न मानता,आपण भाजपा विरोधात एकत्रपणे लढायला हवे,असे आवाहन ममतांनी भाजपाच्या विरोधातील पक्षांना केले आहे.एकंदरित सत्तेवर असताना हवेत असणाऱ्या ममता,त्यांचा दारुण पराभव झाल्यानंतर आता जमिनीवर आल्या आहेत.मात्र आता उशीर झाला आहे,असे ममतांना सुनावणाऱ्या, कॉंग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या पक्षांनी,ममता बॅनर्जी यांच्या आवाहनाची खिल्ली उडवली आहे.कॉंग्रेसच्या एका नेत्याने म्हटले आहे की इतके दिवस इंडिया आघाडीला दुर्लक्षित करणाऱ्या,ममता बॅनर्जी यांना आपला निवडणुकीत पराभव झाल्यानंतर, इंडिया आघाडीची आठवण झाली आहे.२०११,२०१६ आणि २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर, राज्यात तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी जो प्रचंड हिंसाचार घडवून आणला आणि त्याची झळ, कॉंग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला पोहोचली त्या घटना ममता आता विसरलेल्या दिसत आहेत.

ममतांना मात्र त्याचा पश्चात्ताप झालेला दिसत नाही.त्यांनी असे विधान केले आहे की २०११ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत डाव्या आघाडीचा पराभव करून जेव्हा तृणमूल कॉंग्रेस पहिल्यांदा राज्यात सत्तेवर आली तेव्हा आपण राज्यात हिंसाचार होऊ दिला नाही.अर्थात ममता त्याबाबत धडधडीत खोटे बोलत आहेत,हे वेगळे सांगण्याची गरज नाही.ममतांनी असाही दावा केला की,मी राज्याचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांना माझी बुलेटप्रुफ कार पाठवली होती, तसेच त्यांना झेडप्लस सुरक्षा प्रदान केली होती.खरे खोटे परमेश्वराला माहीत.

तृणमूल कॉंग्रेसचे प्रवक्ते रिजू दत्ता यांचे पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबन झाल्यानंतर त्यांनी पक्षावर टीकेचे आसूड ओढले आहेत.हेच ते रिजू दत्ता जे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, पश्चिम बंगालचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्यावर निरनिराळ्या टीव्ही चॅनेल्सवरुन बेफाम आरोप करत होते.मात्र पक्षाने त्यांची हकालपट्टी केल्यानंतर आता त्यांना आपल्या बोलण्याचा पश्चात्ताप झाला आहे.त्यांनी आता सुवेंदू अधिकारी यांचे गोडवे गायला सुरुवात केली आहे.त्यांनी असा दावा केला आहे की, सुवेंदू अधिकारी यांच्या सहाय्यकाची म्हणजेच चंद्रनाथ रथ यांची हत्या झाल्यानंतर जर सुवेंदू अधिकारी यांनी बदला घेण्याची भाषा केली असती तर पश्चिम बंगालमधे मोठ्या प्रमाणात हिंसाचार झालाअसता आणि त्यामध्ये तृणमूलचे कमीतकमी पाच हजार कार्यकर्ते मारले गेले असते.परंतु सुवेंदू अधिकारी यांनी आपल्या कार्यकर्त्यांना शांत रहाण्याचे आवाहन केले आणि कायदा हातात न घेण्याचा सल्ला दिला.त्यामुळे मोठा अनर्थ टळला.रिजू दत्ता यांनी आपल्या पक्षावर टीका करताना असे विधान केले आहे की, राज्यातील जनता तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यशैलीला अतिशय वैतागली होती.जनतेला छोट्या छोट्या कामांसाठीही,तृणमूलला कमिशन द्यावे लागत होते.रिजू दत्ता यांनी पक्षावर केलेला सर्वात मोठा आरोप म्हणजे, खेडेगावांतील हिंदू महिलांवर तृणमूल कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात अत्याचार करण्यात आले.त्यामुळे महिलावर्ग मोठ्या प्रमाणात तृणमूल कॉंग्रेसपासून दुरावला.रिजू दत्ता यांनी आणखी एक महत्वाचे विधान केले आहे.ते म्हणाले, भाजपाला जी सत्तेवर येण्याची संधी मिळाली आहे, तीचे ते सोने करतील आणि २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत, तृणमूलचे कार्यकर्ते जेंव्हा मते मागण्यासाठी घरोघरी जातील तेव्हा लोक त्यांना दारातही उभे करणार नाहीत.अर्थात रिजू दत्ता यांना हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे.तृणमूल कॉंग्रेसचा निवडणुकीत विजय झाला असता तर हे शहाणपण त्यांना सूचले असते का,हा महत्त्वाचा प्रश्न आहे. भाजपाची प्रशंसा करून रिजू दत्ता यांना भाजपात प्रवेश करायचा असावा.परंतु त्यांचा तो हेतू साध्य होणार नाही.कारण भाजपाचे पश्चिम बंगाल प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी म्हटले आहे की रिजू दत्ता यांच्यासारख्या लोकांसाठी भाजपाची दारे बंद करण्यात आली आहेत.

ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल कॉंग्रेसचा निवडणुकीत दारुण पराभव झाला, ममता स्वतः निवडणुकीत पराभूत झाल्या त्यामुळे त्यांच्यासाठी विधानसभेचे दरवाजे बंद झाले आहेत. अशा परिस्थितीत रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याचा मार्ग त्या बहुदा पत्करतील.मात्र या संघर्षात त्यांना आपल्या पक्षातील किती नेत्यांची साथ मिळेल हा महत्त्वाचा प्रश्न आहे.नजीकच्या भविष्यात ममतांचे काही सहकारी त्यांची साथ सोडून भाजपामध्ये गेले तर आश्चर्य वाटायला नको.त्यांना गेली पंधरा वर्षे सत्तेत रहाण्याची सवय झाली आहे.त्याशिवाय काही नेत्यांच्या विरोधात इडी सीबीआय यांची चौकशी सुरू आहे.काही नेत्यांच्या डोक्यावर इडी, सीबीआय, इन्कम टॅक्स यांची टांगती तलवार आहे. अशा परिस्थितीत स्वतःला सुरक्षित ठेवण्याचा एकच उपाय त्यांच्या समोर आहे,तो म्हणजे भाजपात प्रवेश करणे.तृणमूलचे अनेक नेते भाजपात प्रवेश करण्यासाठी उत्सुक असणार,हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. अशा परिस्थितीत पक्ष एकसंध ठेवण्यासाठी, ममतांना बरीच कसरत करावी लागेल.

पश्चिम बंगालचा आजवरचा इतिहास पाहिला तर जे पक्ष प्रदीर्घ काळ राज्यात सत्तेवर राहिले,ते सत्तेवरून खाली उतरल्यानंतर अतिशय कमकुवत झाले.कॉंग्रेस राज्यात २५ वर्षे सत्तेत होती. सत्तेवरून खालीउतरल्यावर कॉंग्रेसची ताकद इतकी कमी होत गेली की विधानसभेत किंवा लोकसभेत एक दोन जागा मिळवणेही पक्षासाठी अवघड होऊन बसले.मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी आघाडी राज्यात ३४ वर्षे सत्तेत होती.मात्र सत्तेतून पायउतार झाल्यानंतर, आघाडीची इतक्या वेगाने घसरगुंडी झाली की,गेल्या खेपेस पक्षाला विधानसभेत एकही आमदार निवडून आणता आला नाही. लोकसभेतही पक्षाचा एकही खासदार गेल्या खेपेला पश्चिम बंगाल मधून निवडून आला नाही या पार्श्वभूमीवर तृणमूल कॉंग्रेसच्या नशिबात काय लिहिले आहे,या प्रश्नाचे उत्तर येणारा काळच आपल्याला देऊ शकेल.


## हाय-क्लास ट्रेडिंग अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालयः** ०२, शांती कुटीर इमारत, शिवाजी रोड, एम. जी. रोड जवळ, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०० ०६७
दूरध्वनीः २२८७४०८४/२२८७४०८५, ईमेलः info@hiklass.co.in,
**सीआयएनः एल५१९००एमएच१९९२पीएलसी०६६२६२**

**३१ मार्च २०२६ रोजी संपणाऱ्या वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकालांचे विवरण**

(रु. लाखांमध्ये)

| अनु. क्र. | तपशील | सध्याचे संपलेले त्रैमासिक | गतवर्षांमधील संपलेले त्रैमासिक | संपलेले वर्ष | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | ३१/०३/२६ | ३१/०३/२५ | ३१/०३/२६ | ३१/०३/२५ |
| | | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १ | कार्यामधून एकूण उत्पन्न | ६४.११ | ५.५४ | ४६३.६२ | ३२.८९ |
| २ | या कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) करापूर्वी (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींपूर्वी) | (३००.४३) | (८२.४९) | (१०५.५२) | (५१.३८) |
| ३ | या कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) कर-पूर्व (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबींनंतर) | (३००.४३) | (८२.४९) | (१०५.५२) | (५१.३८) |
| ४ | करपश्चात कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी) | (२३२.१३ ) | (७३.१५) | (१४८.२०) | (४२.०४) |
| ५ | कालावधीचे एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (यात कालावधीचा नफा / (तोटा) (कर-पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर-पश्चात) यांचा समावेश आहे) | (२३२.२१) | (६४.६०) | (८६.८८) | (३३.४९) |
| ६ | समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ५/- प्रती समभाग) | १,५१०.८७ | ७१०.६२ | ७१०.६२ | ७१०.६२ |
| ७ | राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून), जसा मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविला आहे | - | - | - | - |
| ८ | प्रती भाग उत्तपन्न (प्रत्येकी रु. ५/-) (ए) मूळः (बी) सोम्यीकृतः | (०.९५)<br>(०.९५) | (०.५१)<br>(०.५१) | (०.८९)<br>(०.८९) | (०.३०)<br>(०.३०) |

**टीपः**
१ . वरील लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष हे कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या 'कंपन्या (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५' (इंड एएस) नुसार तयार करण्यात आले आहेत.
२. वरील लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे हाय-क्लास ट्रेडिंग अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड (यापुढे 'कंपनी' म्हणून संदर्भित) च्या लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले असून, २९ मे, २०२६ रोजी आयोजित त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये संचालक मंडळाने त्यांना मंजुरी दिली आहे. भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळाच्या (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ (सुधारित) च्या नियमन ३३ अन्वये आवश्यक असलेले पुनरावलोकन वैधानिक लेखापरीक्षकांनी केले असून, त्यांनी वरील लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर कोणतेही बदल नसलेले मत व्यक्त केले आहे.
३. इंड एएस १०८ कार्यकारी विभागच्या आवश्यकतेनुसार—संसाधनांचे वाटप आणि कामगिरीचे मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने आर्थिक माहितीचे मूल्यांकन करून—कंपनीने आपला व्यवसाय 'एकच विभाग' म्हणून निश्चित केला आहे; ज्यामध्ये लाभांश, व्याज आणि गुंतवणुकीवरील नफा यांद्वारे उत्पन्न मिळवण्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले जाते. त्यानुसार, सदर मानकाप्रमाणे स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्यायोग्य असा कोणताही वेगळा विभाग अस्तित्वात नाही.
४. दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीचे आणि दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आकडे हे 'संतुलित आकडे' आहेत. हे आकडे—अनुक्रमे ३१ मार्च २०२६ आणि ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी प्रकाशित केलेल्या 'वर्ष-ते-दिनांक' आकडेवारीमधील, आणि चालू वर्षाच्या/मागील वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या अखेरपर्यंत प्रकाशित केलेल्या (व ज्यांचे 'मर्यादित पुनरावलोकन' करण्यात आले होते) आकडेवारीमधील—फरकावरून काढण्यात आले आहेत.
५. मागील तिमाहींचे/वर्षाचे आकडे, जिथे आवश्यक असेल तिथे, पुन्हा गटबद्ध करण्यात आले आहेत.

हाय-क्लास ट्रेडिंग अँड इन्व्हेस्टमेंट लि. यांच्याकरिता
स्वा/- संजय कुमार जैन
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएनः००४१५३१६)

स्थळः मुंबई
दिनांकः २९ मे २०२६



CRP Risk Management
Effective Alliances, Effective Solutions

## CRP RISK MANAGEMENT LIMITED

**CIN:** L72100MH2000PLC124689
**Registered Office:** B - 208,209 Classique Centre, Off. Mahakali Caves, Andheri - (East), Mumbai, 400093 | **Tel:** 022-42116000
**Email ID:** compliance@crp.co.in | **Website:** www.crp.co.in

**Statement of Audited Financial Results for the Year Ended on 31st March, 2026**

(₹ In Lacs )

| Sr. No. | Particulars | Year ended on 31.03.2026 Audited | Year ended on 31.03.2025 Audited |
|---|---|---|---|
| A | **EQUITY AND LIABILITIES** | | |
| 1 | **Shareholders' funds** | | |
| a) | Share Capital | 1,748.49 | 1,748.49 |
| b) | Reserves and Surplus | 4,186.79 | 4,311.13 |
| c) | Security Money received | - | - |
| | **Sub-total of Shareholders' funds** | **5,935.28** | **6,059.62** |
| 2 | **Share Application Money pending Allotment** | - | - |
| 3 | **Minority Interest** | - | - |
| 4 | **Non-current Liabilities** | | |
| a) | Long-term borrwings | 1,503.00 | 1,514.37 |
| b) | Defferedtax liabilities (net) | - | - |
| c) | Other long-term liabilities | - | - |
| d) | Long-term provisions | - | - |
| | **Sub-total of Non-current Liabilities** | **1,503.00** | **1,514.37** |
| 5 | **Current Liabilities** | | |
| a) | Short-term borrowings | 800.10 | 800.10 |
| b) | Trade payables | | |
| i) | Total outstanding dues of micro enterprises and small enterprises; and | - | - |
| ii) | Total outstanding dues of creditors other than micro enterprises and small enterprises. | 2.70 | 2.70 |
| c) | Other current liabilities | 51.97 | 48.92 |
| d) | Short term provisions | 489.46 | 489.46 |
| | **Sub-total of Current Liabilities** | **1,344.23** | **1,341.19** |
| | **TOTAL EQUITY AND LIABILITIES** | **8,782.51** | **8,915.18** |
| B | **ASSETS** | | |
| 1 | **Non-current assets** | | |
| a) | Fixed assets | 1,128.75 | 1,128.75 |
| b) | Goodwill on consoliodation | - | - |
| c) | Non current investments | 33.25 | 33.25 |
| d) | Deffered tax assets (net) | 412.54 | 412.54 |
| e) | Long term loans and advances | - | - |
| f) | Other non current assets | - | - |
| | **Sub total of Non current assets** | **1,574.54** | **1,574.54** |
| 2 | **Current assets** | | |
| a) | Current investments | - | - |
| b) | Inventories | 243.87 | 243.87 |
| c) | Unbilled Revenue | - | - |
| d) | Trade receivables | 5,018.95 | 5,102.24 |
| e) | Cash and cash equivalents | 8.20 | 8.20 |
| f) | Short term loans and advances | 1,800.97 | 1,850.36 |
| g) | Other current assets | 135.98 | 135.98 |
| | **Sub total of Current assets** | **7,207.97** | **7,340.64** |
| | **Total Assets** | **8,782.51** | **8,915.18** |

**Note:**
1. The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at their respective meetings held on 28th May, 2026.
2. Figures are regrouped/rearranged wherever necessary.
3. The figurs for half year ended March 31,2026 and March 31,2025 are the balancing figures between audited figures in respect of the full financial year and the published year to date figures upto the end of the Half year, which were subject to limited review by auditor.

**For CRP Risk Management Limited**
**Sd/-**
**Raza Mohammed Sayyed**
**Managing Director**

**Place :** Mumbai
**Date :** 28th May, 2026